महासत्ता एकच आवृत्ती

# सायबर क्राईम रोखण्यासाठी जनजागृती गरजेची

**सारंग बालंके**

**सै.टाकळी, ता.२६ (प्रतिनिधी)**



सायबर क्राईम शालेय विद्यार्थी व ज्येष्ठ नागरिक यांच्या बाबतीत जास्तीत जास्त घडून येतो. याची दखल घेऊन रोटरी क्लब व क्विक हिल फाउंडेशन च्या माध्यमातून जनजागृतीचे काम शालेय स्तरावर सुरु केले असलेचे मत रोटरी क्लबचे अध्यक्ष सारंग बालंके यांनी व्यक्त केले. ते येथील श्री छत्रपती शिवाजी हायस्कूल मध्ये सायबर गुन्ह्यांवर प्रतिबंध आणि सोशल मिडियाचा जबाबदारीने वापर या विषयावर क्विक हिल फाउंडेशन व रोटरी क्लब पुणे यांच्यावतीने स्पेशल सायबर सेमिनारचे आयोजन करण्यात आले होते यावेळी ते बोलत होते. यावेळी फॉरेन्सिक लॉचे दिनेश सुभेदार यांनी मोबाईल इंटरनेट, वापरण्या बाबतच्या योग्य पद्धतीच्या सूचना आपल्या मार्गदर्शनपर सेमिनारमध्ये दिल्या.

ऑनलाईन गेम्स, व्हाट्सअप कॉल, फेसबुक, इंस्टाग्राम आदीच्या नोंदणी व वापराबाबतच्या सूचना विद्यार्थ्यांना प्रात्यक्षिकांसह करून दाखवल्या. सायबर गुन्ह्यांचे प्रमाण दिवसेंदिवस वाढत आहे यासाठी विद्यार्थी म्हणून आपण कसे सजग रहावे. याविषयीची संपूर्ण खबरदारी कशी घ्यावी. याविषयीची संपूर्ण पूरक अशी माहिती रोटरी क्लब ऑफ पुणेचे प्रेसिडेंट सारंग बालंखे यांनी विद्यार्थ्यांना सांगितली. शाळेतील सुमारे शंभर विद्यार्थ्यांनी या सेमिनारमध्ये सहभाग नोंदवला. कार्यक्रमाची सांगता सर्व विद्यार्थी व शिक्षकांना सायबर शपथ देऊन करण्यात आली. मुख्याध्यापक विनोद पाटील यांच्या हस्ते प्रमुख वक्त्यांचा सत्कार करण्यात आला. स्वागत उदय पाटील यांनी आभार एम.एम .धुमाळे यांनी मानले.